**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म.**/ /
दि. १७/०६/२०२६

वैद्यकीय आरोग्य विभाग

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत *१६ जून ते ३१ जुलै २०२६* दरम्यान '*तीव्र अतिसार नियंत्रण मोहीम*' (Intensive Diarrhea Control Campaign) सुरू झाले आहे.

*शून्य ते पाच वर्षे* वयोगटातील मुलांमधील अतिसार (जुलाब) आणि त्यामुळे होणारे कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या अंतर्गत दिनांक १६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'तीव्र अतिसार नियंत्रण मोहीम' (Intensive Diarrhea Control Campaign) अत्यंत प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

पावसाळ्याच्या दिवसांत दूषित पाणी आणि अस्वच्छतेमुळे बालकांमध्ये अतिसाराचा धोका वाढतो. हा धोका टाळण्यासाठी आणि पालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

> *मोहिमेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि उपक्रम :*

*घरोघरी ओआरएस (ORS) आणि झिंकचे वाटप*: महानगरपालिका क्षेत्रातील आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी वय ५ वर्षांखालील बालके असलेल्या घरांना भेटी देऊन ओआरएस (ORS) पाकिटांचे मोफत वाटप करत आहेत.

*प्रात्यक्षिके आणि समुपदेशन*: जुलाब झाल्यास घरीच ओआरएस (ORS) चे द्रावण कसे तयार करावे, याचे प्रात्यक्षिक पालकांना दाखवले जात आहे. तसेच बालकाला झिंकच्या गोळ्या देण्याचे महत्त्व समजावून सांगितले जात आहे.

*स्तनपानाबाबत जनजागृती* :अतिसाराच्या काळातही मातांनी बालकांचे स्तनपान सुरू ठेवणे किती गरजेचे आहे, याचे समुपदेशन आरोग्य केंद्रांद्वारे केले जात आहे.

*स्वच्छतेचे महत्त्व* : 'हात धुण्याची योग्य पद्धत' आणि वैयक्तिक तसेच परिसराची स्वच्छता राखण्याबाबत नागरिकांना प्रवृत्त केले जात आहे.

> *नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विशेष व्यवस्था :*

महानगरपालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ओआरएस आणि झिंक कॉर्नर (ORS-Zinc Corners) स्थापित करण्यात आले आहेत. येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला आणि पालकांना आवश्यक ते उपचार आणि मार्गदर्शन मोफत उपलब्ध करून दिले जात आहे.

> *वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत आवाहन :*

"अतिसार हा वेळीच उपचार केल्यास पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. पालकांनी बालकांकडे विशेष लक्ष द्यावे. जुलाब सुरू झाल्यास घाबरून न जाता तातडीने जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा. महानगरपालिकेच्या या मोहिमेचा लाभ घेऊन आपल्या बालकांचे आरोग्य सुरक्षित करावे," असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.